पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.
मा.स्थायी समिती
**कार्यपत्रिका क्रमांक – ७९**
(सभावृत्तांत)

**दिनांक – ०५/०९/२०१८** **वेळ – दुपारी २.०० वाजता**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा बुधवार, दिनांक ०५/०९/२०१८ रोजी दुपारी २.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.ममता विनायक गायकवाड - सभापती
२. मा.राजू मिसाळ
३. मा.अमित राजेंद्र गावडे
४. मा.गावडे राजेंद्र तानाजी
५. मा.आंगोळकर सागर सुनिल
६. मा.करुणा शेखर चिंचवडे
७. मा.लोंढे नम्रता योगेश
८. मा.मडिगेरी विलास हनुमंतराव
९. मा.गीता सुशिल मंचरकर
१०. मा.खानोलकर प्रज्ञा महेश
११. मा.डोळस विकास हरिश्चंद्र
१२. मा.बारणे अर्चना तानाजी
१३. मा.साधना अंकुश मळेकर

याशिवाय मा.आष्टीकर - अतिरिक्त आयुक्त (१) मा.गावडे - अतिरिक्त आयुक्त (२) मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.कुंभोजकर - मुख्यलेखापरिक्षक, मा.चव्हाण - शहर अभियंता, मा.डॉ.रॉय - आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.ठाकूर - उपसंचालक नगररचना, मा.कोळंबे – मुख्य लेखापाल, मा.पाटील, मा.तुपे, मा.पठाण – सह शहर अभियंता, मा.चितळे, मा.खोराटे, मा.दुरगुडे, मा.इंदलकर, मा.झगडे - सहाय्यक आयुक्त, मा.लोणकर, मा.बोदडे, मा.दांगट, मा.खोत – प्र. सहाय्यक आयुक्त, मा.साळुंके – मुख्य उद्यान अधिक्षक, मा.शिंदे – प्रशासन अधिकारी (प्राथमिक शिक्षण विभाग), मा.मुंढे – प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक शिक्षण) मा.पोमण – मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.निकम, मा.सवणे, मा.तांबे, मा.चव्हाण, मा.कुलकर्णी, मा.जुंधारे, मा.औंभासे, मा.गट्टुवार,

मा.पुजारी, मा.गायकवाड, मा.मोरे, मा.पाटील, मा.घुबे, मा.सुपेकर, मा.देशमुख, - कार्यकारी अभियंता, मा.डॉ.दगडे – पशुवैद्यकिय अधिकारी, मा.जगताप – कामगार कल्याण अधिकारी, मा.जरांडे – सुरक्षा अधिकारी, मा.माने – पीएमपीएमएल हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करून घेणेत आले –**

विषय क्र.२५) मुंबई पुणे रस्त्यावरील अंडरपास व कमानीवर जाहिरात प्रसिध्दीचे हक्क निविदा कार्यवाही पुर्ण होईतो मे.माई मिडीया हाऊस एम एच १४ प्रा.लि. या संस्थेस देणेबाबत - मा.विकास डोळस, मा.नम्रता लोंढे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२६) तरतूद वर्गीकरणाबाबत.

विषय क्र.२७) फ क्षेत्रीय कार्यालय स्थापत्य विभागासाठी नविन वाहन खरेदीकामी येणा-या खर्चास देणेबाबत.

विषय क्र.२८) मा.सभापती शिक्षण समिती यांच्या वापराकरीता नविन TATA ZEST (PETROL) वाहन खरेदीकामी येणा-या खर्चास मान्यता देणेबाबत.

विषय क्र.२९) श्री.राहूल जाधव, मा.महापौर यांचे मोबाईल क्र.९६६५४६३६३६ वर इंटरनॅशनल रोमिंग व आय.एस.डी.सुविधा पुरविणेस व होणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता मिळणेबाबत.

विषय क्र.३०) वैद्यकिय विभागाकडील विविध अभिमानाची पदे हंगामी स्वरूपात भरणेबाबत.

विषय क्र.३१) पीएमपीएमएल संस्थेस संचलनतूट व विविधप्रकारचे पासेसपोटी सप्टेंबर २०१८ ते फेब्रुवारी २०१९ अखेर अदा करावयाचे रकमेस मान्यता देणेबाबत.

विषय क्र.३२) स्वाईन फ्ल्यु आजारासाठी आवश्यक असणारे Cap Oseltamivir 75mg खरेदी करणेबाबत.

विषय क्र.३३) मनपाचे गणवेश देय कर्मचा-यांना पावसाळी साधने रेनकोट/रेनसुट साहित्य खरेदीबाबत.

विषय क्र.३४) अभियंता दिनानिमित्त आयोजित करावयाच्या प्रशिक्षणाबाबत – मा.विकास डोळस, मा.करूणा चिंचवडे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३५) निगडी-दापोडी रस्त्यावरील बीआरटीएस बस सेवा चालु कालावधीतील रोड सेफ्टी ऑडीट (Safety Evaluations) करणेबाबत.

विषय क्र.३६) मा.स्थायी समिती सभेच्या आयोजनाबाबत – मा.विलास मडिगेरी, मा.राजेंद्र गावडे यांचा प्रस्ताव

----------

(मा.कोळंबे, मुख्यलेखापाल यांची महापालिकेत नियुक्ती झाली असल्यामुळे आणि मा.लोणकर प्र.सहा.आयुक्त यांची ऑफिसर ऑफ दि मन्थ म्हणून निवड झाली असल्यामुळे मा. सभापती, स्थायी समिती यांचे हस्ते सत्कार करण्यात आला)

----------

अ) दिनांक २१/०८/२०१८ व २९/०८/२०१८ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक ७७)** चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ब) दिनांक २९/०८/२०१८ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक ७८)** चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक - ३१०५ विषय क्रमांक - ०१
दिनांक – ०५/०९/२०१८ विभाग – मध्यवर्ती साहित्य भांडार (वैद्यकिय)
सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे
संदर्भ – मा.सहा.आयुक्त, भांडार यांचे जावक क्र.मसाभां/१/कावि/३१६/२०१८ दि.२१/०८/२०१८

मा.सहा.आयुक्त, भांडार यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाचे नविन भोसरी रुग्णालयाकरिता आवश्यक असणारे High pressure autoclave खरेदीकामी प्रसिध्द करणेत आलेल्या ई-निविदेप्रमाणे M/s Esteem Industries या कंपनीचे अधिकृत विक्रेते मे. ट्रिनीटी एन्टरप्रायजेस यांनी सादर केलेले लघुत्तम दर र.रु.१३,५०,०००/- साठी निविदा अट क्र.१७ नुसार प्रथम वर्ष गॅरंटी/वॉरंटी व पुढील ३ वर्षाकरिता वार्षीक देखभाल व दुरूस्तीकामी १% एएमसी करिता करारनामा करुन व अनामत रक्कम घेऊन येणारे र.रु.१३,५०,०००/- (अक्षरी र.रू.तेरा लाख पन्नास हजार फक्त) चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३१०६ विषय क्रमांक - ०२
दिनांक – ०५/०९/२०१८ विभाग – ब क्षेत्रीय, आरोग्य
सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.करूणा चिंचवडे
संदर्भ – मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे जावक क्र.बक्षेआ/०५/कावि/५३०/२०१८ दि.२८/०८/२०१८

मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे –

निवडणूक जुने प्रभाग क्रमांक २०,२१,२२,२३,२४,४२,५२ मधील दैनंदिन शौचालय साफसफाईकामी या पूर्वी मा.आयुक्त यांचेकडील आदेश क्र.आ/४/कावि/१८४/२००८ दि.६/५/२००८ नुसार क्षेत्रीय अधिका-यांना प्रदान केलेल्या अधिकारानुसार स्थानिक बेरोजगारांच्या सहकारी संस्था,स्वयं सेवी संघटना यांचे कडून साफसफाईचे काम करारनामा करुन घेणेत येतो. सदर आदेशानुसार असे करार जास्तीत जास्त ११ वर्षापर्यतच्या कालावधीसाठी करता येतात. त्यानुसार ब क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील अशा प्रकारचे काम करणा-या संस्था मे. दीन महिला आधार रोजगार संस्था यांची करारनाम्याची मुदत दिनांक ३१/०३/१८ रोजी व मे.महर्षि वाल्मिकी स्वयं रोज

सेवा संस्थेची मुदत दि. ३१/३/१८ रोजी संपुष्टात आलेली आहे. त्यामुळे मे. दीन महिला आधार रोजगार संस्था संस्थांना पुढील नविन निविदा कार्यवाही पुर्ण होई पर्यंत मुदतवाढ देणेस मा.आयुक्त दिनांक-२०/१२/१६ व दि.१८/३/१७ च्या प्रस्तावानुसार मान्यता दिलेली आहे. सद्य स्थितीत जुन्या प्रभाग रचनेनुसार प्र.क्र.२३,२४ व ४२ अ प्रभागात समाविष्ट झाला असून ५२ चा ड प्रभागात समावेश झाला आहे. वरील आदेशात नमूद केलेप्रमाणे प्रति सीट २५०/- या दराने करुन घेणेस व याकामी येणा-या र.रू. ११,१३,०००/- अपेक्षित खर्चाचा विषय मा.स्थायी समिती पुढे अवलोकनार्थ ठेवणेकामी कामाचा सविस्तर तपशील:-

| अ. क्र. | ठेकेदाराचे नाव | प्रभाग क्रमांक | सीटस संख्या | प्रति महा प्रति सीट र.र.२५०/-प्रमाणे अपेक्षित खर्च दि.१/४/१८ ते दि.३१/१०/१८ |
|---|---|---|---|---|
| १ | मे. दीन महिला आधार रोजगार संस्था | ४२ | १०७ | १,८७,२५०/- |
| २ | मे.महर्षि वाल्मिकी स्वयं रोज सेवा सह सं. | २०,२१,२२,२३, २४,४२,५२ | ५२९ | ९,२५,७५०/- |
| | | एकूण | ६३६ | ११,१३,०००/- |

उपरोक्त नमूद केलेनुसार कामाची निकड व सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने मा.आयुक्त यांनी दिनांक-२०/१२/१६ व दि.१८/३/१७ रोजीच्या प्रस्तावानुसार सदर कामासाठी निविदा प्रक्रीया पुर्ण होईपर्यंत मुदतवाढ देणेस मान्यता दिलेली आहे. विषयांकीत कामाचा दि.१/४/१८ ते दि.३१/१०/१८ अथवा नविन निविदा कार्यवाही पुर्ण होई पर्यंत यापैकी जे प्रथम होईल तो पर्यंतच्या कालावधीसाठीचा मे.महर्षि वाल्मिकी स्वयं रोज सेवा सह सं. यांचे सोबत करारनामा करण्यात आला असून इकडील क्र.बक्षेआ/५/कावि/ ४६९/२०१८ दि.३०/०७/२०१८ अन्वये कामाचा आदेश देण्यात आलेला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३१०७ विषय क्रमांक - ०३

दिनांक – ०५/०९/२०१८ विभाग – लेखा

सूचक – मा.नम्रता लोंढे अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.लेखा/०६/कावि/९७८९/२०१८ दि.२८/०८/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

शहर अभियंता "अ क्षेत्रिय" कार्यालय स्थापत्य यांनी दि.९/०८/२०१८ चे प्रस्तावान्वये स्थापत्य अ मुख्यालय या विभागाकडील सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पातील या स्थापत्य विषयक

कामांसाठी अपुरी तरतूद आहे. स्थापत्य विशेष योजना, भांडवली व महसुली कामे या लेखाशिर्षांतर्गत प्रस्तावात नमूद प्रमाणे तरतुदी र.रु.२५,७०,०००/- (अक्षरी र.रू.पंचवीस लाख सत्तर हजार फक्त) वर्गीकरण करणेस मा.महापालिकासभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा. (वाढ/घट र.रू.२५.७०,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३१०८ विषय क्रमांक - ०४

दिनांक – ०५/०९/२०१८ विभाग – लेखा

सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.अर्चना बारणे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.लेखा/०६/कावि/९७८८/२०१८ दि.२४/०८/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

प्रशासकीय व कार्यालयीन कामकाजाच्या सोईच्या दृष्टीने सर्व प्रेक्षागृहे यांचे कामकाज स्वतंत्रपणे न ठेवता भौगोलिक क्षेत्रानुसार तेथील क्षेत्रीय अधिका-यांच्या नियंत्रणाखली देणे आवश्यक असल्याने आदेश क्र. प्रशा/२/कावि/७१७/२०१७दि. २९/९/२०१७ अन्वये ह क्षेत्रिय कार्यालयाकडे वर्ग करण्यात आलेले असुन तेथील कर्मचा-यांचे आस्थापना व वेतनविषयक कामकाज हे "ह" क्षेत्रिय कार्यालयामार्फत करण्यात येत आहे. उपरोक्त आदेशानुसार व पत्र प्रशा/२/कावि/१०५/२०१८ दि. ५/४/२०१८ अन्वये आचार्य अत्रे रंगमंदिर व नटसम्राट निळु फुले रंगमंदीर येथील सन २०१८-१९ साठी महसुली जमा व महसुली खर्च याबाबत अंदाजपत्रकात केलेल्या तरतुदी या "ह" क्षेत्रिय कार्यालय प्रशासन अंदाजपत्रकात लेखाशिर्षासह वर्ग करणे आवश्यक आहे. सन २०१८-१९ या आर्थिक वर्षातील आचार्य अत्रे प्रेक्षागृह लेखाशिर्ष ६ जमा र.रु ३३,३५,०००/- लेखाशिर्ष १५ खर्च र.रु १,०४,६१,९४०/- निळुभाऊ फुले नाट्यगृह लेखाशिर्ष ६ जमा र.रु.४७,१०,०००/- लेखाशिर्ष १६ खर्च र.रु.८९,०२,३८०/- लेखाशिर्षावर वर्गीकरण करावे लागेल. वरीलप्रमाणे क्षेत्रिय अधिकारी ह क्षेत्रिय कार्यालय यांना प्रस्तावित केलेनुसार सन २०१८-१९ या आर्थिक वर्षातील आचार्य अत्रे प्रेक्षागृह लेखाशिर्ष ६ जमा र.रु ३३,३५,०००/- लेखाशिर्ष १५ खर्च र.रु.१,०४,६१,९४०/- निळुभाऊ फुले नाट्यगृह लेखाशिर्ष ६ जमा र.रु.४७,१०,०००/- लेखाशिर्ष १६ खर्च र.रु.८९,०२,३८०/- प्रस्तावात नमूद प्रमाणे या रक्कमा व लेखाशिर्ष "ह क्षेत्रिय" कार्यालयाकडे वर्गीकरण करणेस मा.महापालिकासभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३१०९ विषय क्रमांक - ०५
दिनांक – ०५/०९/२०१८ विभाग – लेखा
सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.साधना मळेकर
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.लेखा/०६/कावि/९७९०/२०१८ दि.२८/०८/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

शहर अभियंता, इ क्षेत्रिय कार्यालय स्थापत्य यांनी दि.९/०८/२०१८ चे प्रस्तावान्वये सन २०१८-१९ अंदाजपत्रकातील स्थापत्य “भांडवली कामे" या लेखाशिर्षावरील प्रस्तावात नमूद प्रमाणे चालू कामात तरतूद कमी पडत आहे. सदर चालू कामांवर मार्च २०१८ अखेर पुरेशी तरतूद करण्यात आली होती. तथापि सदर रस्त्याचे काम स्थानिक रहिवाशी यांनी अडविले होते. त्यामुळे रक्कम खर्च होऊ शकली नाही. सद्यस्थितीत जागा मालक यांनी काम करणेस मान्यता दिलेली असून त्याप्रमाणे काम करणेत आलेले असल्याने प्रस्तावात नमूद प्रमाणे र.रु.२०,००,०००/- वर्गीकरण करणेस मा. महापालिकासभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा. (वाढ/घट र.रू.२०,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३११० विषय क्रमांक - ०६
दिनांक – ०५/०९/२०१८ विभाग – क्रिडा
सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/०४/कावि/२०४/२०१८ दि.२५/०७/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मा.क्रीडा, कला साहित्य व सांस्कृतिक समिती सभा ठराव क्र.३३ दि.१३/८/२०१८ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने व महाराष्ट्र राज्य रोलबॉल असोसिएशन यांच्या मान्यतेने, पिंपरी चिंचवड शहर रोलबॉल असोसिएशन यांच्या सहकार्याने सन २०१८ मध्ये प्रबोधनकार ठाकरे मैदानावरील स्केटिंग रिंग, यमुनानगर, निगडी येथे महापौर चषक राज्यस्तर रोलबॉल स्पर्धा २०१८-१९ आयोजित करणेस व त्याकामी येणा-या र.रु.७,०७,३४०/- अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे व स्पर्धा अनुषंगाने एकूण खर्च र.रु.७,०७,३४०/- (अक्षरी र.रू. सात लाख सात हजार तीनशे चाळीस फक्त) मधील स्टेज, टेबल, खुर्च्या व्यवस्था खर्च, खेळाडू निवास व्यवस्था अनुषंगाने करावयाचा खर्च एकूण र.रु.१,३२,२००/- हा स्थापत्य विषयक खर्च, स्थापत्य विभाग, संबंधित क्षेत्रीय कार्यालय यांचे लेखाशिर्षातून खर्ची टाकणेस व विद्युत स्पिकर व माईक, जनरेटर व्यवस्था खर्च र.रु.४०,०००/- हा विद्युत विषयक खर्च, विद्युत विभाग, संबंधित क्षेत्रीय कार्यालय यांचे लेखा शिर्षातून खर्ची टाकणेस व उर्वरित स्पर्धा अनुषंगाने येणारा खर्च र.रु.५,३५,१४०/- हा क्रीडा विभागाचे महापौर चषक विविध क्रीडा स्पर्धा या लेखाशिर्षावर खर्ची टाकणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक - ३१११ विषय क्रमांक - ०७
दिनांक – ०५/०९/२०१८ विभाग – क्रिडा
सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.करूणा चिंचवडे
संदर्भ – मा.सुजाता पालांडे, मा. कुंदन गायकवाड यांचा प्रस्ताव -

मा.क्रीडा, कला साहित्य व सांस्कृतिक समिती सभा ठराव क्र.३४ दि.१३/८/२०१८ अन्वये प्रभाग क्र.२० मधील सरदार वल्लभभाई पटेल इमारतीमधील हॉल टेबल टेनिससाठी लिप ऍकडमी स्पोर्टस या संस्थेला नाममात्र दरावर चालविण्यास देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३११२ विषय क्रमांक - ०८
दिनांक – ०५/०९/२०१८ विभाग – क्रिडा
सूचक – मा.लोंढे नम्रता अनुमोदक – मा.अर्चना बारणे
संदर्भ – मा.शैलेश मोरे, मा. कुंदन गायकवाड यांचा प्रस्ताव -

मा.क्रीडा, कला साहित्य व सांस्कृतिक समिती सभा ठराव क्र.३५ दि.१३/८/२०१८ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे अण्णासाहेब मगर स्टेडीयम मोडकळीस आले आहे. त्याची दुरुस्ती व काही सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. तसेच शहरामध्ये इतरही काही मैदाने व विविध खेळांच्या क्रीडा सुविधा अधिक चांगल्या प्रकारे उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे. त्यादृष्टीने दिल्ली येथील इंद्रप्रस्थ स्टेडीयम तसेच पतियाळा येथील क्रीडा संकुल इत्यादी प्रसिध्द मैदानाची पाहणी करुन त्याचा अभ्यास करण्याच्या हेतूने दिल्ली व पतियाळा येथे मा.क्रीडा, कला, साहित्य व सांकृतिक समिती सदस्य, प्रशासन अधिकारी, क्रीडा व क्रीडा अधिकारी यांचा पाहणी दौरा पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने आयोजित करणे आवश्यक आहे. सबब, पिंपरी चिंचवड शहरामध्ये इतरही काही मैदाने व विविध खेळांच्या क्रीडा सुविधा अधिक चांगल्या प्रकारे उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे. त्या दृष्टीने दिल्ली येथील इंद्रप्रस्थ स्टेडियम तसेच पतियाळा येथील क्रीडा संकुल इत्यादी प्रसिध्द मैदानाची पाहणी करुन त्याचा अभ्यास करण्याच्या हेतून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सदस्य, प्रशासन अधिकारी, क्रीडा व क्रीडा अधिकारी यांचा दिल्ली व पतियाळा येथे पाहणी दौरा आयोजित करणेस व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे व सदरचा खर्च संबंधित विभागाचे लेखाशिर्षातून खर्ची टाकणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३११३ विषय क्रमांक - ०९
दिनांक – ०५/०९/२०१८ विभाग – पर्यावरण अभियांत्रिकी
सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.नम्रता लोंढे
संदर्भ – मा.अति.आयुक्त (२) यांचे जावक क्र.पअक/१/कावि/२३१/२०१८ दि.२९/०८/२०१८

विषय - मनपाच्या मैलाशुध्दीकरण केंद्रे व पंपीग स्टेशनमध्ये उर्जा निर्मितीकामी सोलर सिस्टीम बसविणेकामी.

विषय क्रमांक ०९ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३११४ विषय क्रमांक - १०
दिनांक – ०५/०९/२०१८ विभाग – फ क्षेत्रीय, स्थापत्य
सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे
संदर्भ – मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.फक्षेका/स्था/कावि/५५६/२०१८ दि.१३/०८/२०१८

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या फ क्षेत्रिय कार्यालयाचे कार्यक्षेत्राअंतर्गत विविध स्थापत्य विषयक विकास कामे सन २०१८-१९ चे अर्थसंकल्पामध्ये प्रस्तावित केलेली आहेत. सदर प्रस्तावीत विकास कामे हि वैशिष्ट्यपूर्ण स्वरूपाची आहेत व त्यात काँक्रीटचा रस्ता तयार करणे, विकास योजनेतील रस्ते विकसित करणे, क्रीडा विषयक सोई सुविधा अद्ययावत करणे इत्यादी कामांचा समावेश आहे. सदरची कामे करणे करिता पुरेसे तांत्रिक नैपुण्य महानगरपालिकेकडील अभियंताकडे उपलब्ध असले तरी काही वेळा अपु-या कर्मचारी वर्गामुळे अथवा काही प्रसंगी गुंतागुंतीचे तांत्रिक प्रश्न, आधुनिक तंत्रज्ञानाची गरज, पर्यांवरण विषयक अभ्यास तसेच खाजगी कारणातुन अभ्यास व तत्सम बाबी, सुसाध्यतेची पडताळणी, संशोधनात्मक अभ्यास तसेच खाजगीकरणातुन करावयाच्या प्रकल्पांसाठी कायदेविषयक, अर्थविषयक अन्वेशन अशा बाबींसाठी वास्तुविशारद/ प्रकल्प व्यवस्थापक सल्लागार किंवा तज्ञ नेमण्याची आवश्यकता आहे. या प्रकल्पांतर्गत विविध नाविन्यपूर्ण बाबींचा समावेश करणे आवश्यक आहे. त्याकरिता विस्तृत व परिपूर्ण संकल्पचित्रे व आराखडे तयार करणे, काम वैशिष्ठपूर्ण स्वरूपाचे असलेने सार्वजनिक बांधकाम विभागाकडील मंजूर दरसूचीत समाविष्ठ नसणा-या विविध बाबींचे दरपृथ:करण तयार करून त्यास मान्यता घेणे, निविदा विषयक आवश्यक कामे करणे इ. निविदा पुर्व कामे करणेकरिता तसेच तांत्रिकदृष्टया आराखड्याप्रमाणे काम करुन घेणे, प्रकल्पाचे दैनंदिन कामावर देखरेख ठेवणे इ. निविदापश्च्यात कामे चोखपणे होणे आवश्यक आहे .या सर्व बाबी विचारात घेऊन मनपाच्या वास्तुविशारद/ प्रकल्प व्यवस्थापक सल्लागार पॅनेलवर असलेले या क्षेत्रातील तज्ञ वास्तुविशारद/ प्रकल्प व्यवस्थापक सल्लागार यांची नेमणुक करणेकामी खालील प्रमाणे प्रस्ताव सादर करणेत येत आहे.

| अनु.क्र. | कामाचे नाव | एकक | वास्तुविशारद / प्रकल्प व्यवस्थापक सल्लागार यांचे नाव | प्राप्त दर ( % ) ( जी.एस.टी शिवाय ) | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | निविदा पूर्व कामाकरिता | निविदा पश्च्यात कामाकरिता | एकूण |
| १ | प्रभाग क्र.११ मधील महाबली चौक ते जुन्या आर.टी.ओ ऑफिस पर्यंत कॉंक्रीटचा रस्ता तयार करणे. | % प्रती काम | मे. सी.व्ही.कांड कंन्सल्टंटस प्रा.ली. | ०.७४ | १.०० | १.७४ |
| २ | प्रभाग क्र.११ मधील मंजूर विकास योजनेतील ताब्यात आलेले रस्ते विकसित करणे . | % प्रती काम | मे. सी.व्ही.कांड कंन्सल्टंटस प्रा.ली. | ०.७४ | १.०० | १.७४ |
| ३ | प्रभाग क्र.१ चिखली मधील उर्वरित रस्त्यांचे हॉटमिक्स पद्धतीने डांबरीकरण करणे व नव्याने ताब्यात आलेले रस्ते डांबरीकरण करणे. | % प्रती काम | मे. सी.व्ही.कांड कंन्सल्टंटस प्रा.ली. | ०.७४ | १.०० | १.७४ |

तरी उपरोक्त नमुद केलेल्या मनपाचे फ क्षेत्रीय कार्यालयातील विकास कामांना त्यांचे नावासमोर दर्शविलेले वास्तुविशारद/ प्रकल्प व्यवस्थापक सल्लागार म्हणून नेमणूक करणेबाबत तसेच त्याकामी देय असलेली फी अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३११५ विषय क्रमांक - ११
दिनांक – ०५/०९/२०१८ विभाग – विद्युत मुख्यालय
सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.अर्चना बारणे
संदर्भ – मा.अति.आयुक्त (१) यांचे जावक क्र.विमुका/५/कावि/३०९/२०१८ दि.२८/०८/२०१८

मा.अति.आयुक्त (१) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या विद्युत विभागाकडील नि.नो.क्र.20/5/2017-18 अन्वये अ क्षेत्रीय कार्यालय व इतर आवश्यक ठिकाणी CCTV यंत्रणा बसविणेकामी मे. वैभव एन्टरप्रायजेस नि.र.रू.82,43,175/- (अक्षरी र.रु.ब्याऐंशी लाख त्रेचाळीस हजार एकशे पंच्यात्तर फक्त) पेक्षा 3.41% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजूर दराने र.रू.79,62,083/- पर्यंत काम करून घेणेस या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३११६ विषय क्रमांक - १२

दिनांक – ०५/०९/२०१८ विभाग – विद्युत मुख्यालय

सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.करूणा चिंचवडे

संदर्भ – मा.अति.आयुक्त (१) यांचे जावक क्र.विमुका/५/कावि/३०८/२०१८ दि.२८/०८/२०१८

विषय – मनपाचे भोसरी येथील अंकुशराव लांडगे प्रेक्षागृह इमारतीमधील अग्नीशमन यंत्रणेसाठी नविन रिंग मेन पाईपलाईन टाकणे व अनुषंगिक कामे करणे.

विषय क्रमांक १२ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३११७ विषय क्रमांक - १३

दिनांक – ०५/०९/२०१८ विभाग – वाहन दुरूस्ती कार्यशाळा

सूचक – मा.साधना मळेकर अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे

संदर्भ – मा.अति.आयुक्त (१) यांचे जावक क्र.काशा/१/कावि/७६४/२०१८ दि.२९/०८/२०१८

मा.अति.आयुक्त (१) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिं.चिं.मनपाकडील वाहन दुरुस्ती कार्यशाळा विभागामार्फत मनपाकडील विविध विभागाचे वापरात असलेली हैड्रोलिक लॅडर, डंपर प्लेसर, बी.आर.सी., मैला टँकर, जेटींग मशीन, गुरे वाहक, कारकस व्हॅन, ट्री कटींग, कॉम्पॅक्टर व टिप्पर ही वाहने दुरुस्ती करणेत येतात. सदरची वाहने वेगवेगळ्या विभागामध्ये त्यांचे कार्यालयीन कामासाठी वापर करीत असतात त्याची त्वरीत दुरुस्ती करणे आवश्यक असते. मनपा कडिल ई गटातील वाहनांची दुरूस्ती करणेकामी सन २०१८ ते २०१९ या एक वर्ष कालावधीकरीता एजन्सी निश्चित करणेकामी निविदा सुचना क्र.६/२०१८-१९ निविदा र.रु.१,०५,५९,२२१/- ई-टेंडरिंग द्वारे प्रसिद्ध करुन दर मागविणेत आले असून मे.एस.टी.मोटार्स यांचे दर सर्वात कमी आहेत (निविदा दरापेक्षा १०% कमी + GST वेगळा). उपरोक्त सर्व बाबी विचारात घेता लघुत्तम निविदाधारक मे. एस.टी.मोटार्स यांचे दर निविदा दरापेक्षा १०% कमी+GST वेगळा दराने प्राप्त झालेले आहेत. सदर प्राप्त झालेल्या लघुत्तम दराचे निविदाधारक मे.एस.टी.मोटार्स यांचे दर निविदा दरापेक्षा १०% कमी दराने+GST वेगळा स्विकृत करून त्यांचे समवेत सन २०१८ ते २०१९ या एक वर्ष कालावधीकरीता करारनामा करुन घेवून कामे करुन घेणेस व त्याकामी येणारे र.रु.९५,०३,२९९/- (अक्षरी र.रू.पंच्याण्णव लाख तीन हजार दोनशे नव्याण्णव फक्त)+GST वेगळा अदा करणेचे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३११८ विषय क्रमांक - १४
दिनांक – ०५/०९/२०१८ विभाग – माध्यमिक शिक्षण
सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे
संदर्भ – मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.माशि/३/कावि/३०६/२०१८ दि.३१/०८/२०१८

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका माध्यमिक विद्यालयातील इयत्ता १० वी चे विद्यार्थ्यांसाठी दै.लोकसत्ता व दै.प्रभात यांचेकडून १० वी आभ्यासक्रम अंक खरेदी करणेकामी र.रु.२,३४,०००/- (अक्षरी र.रू. दोन लाख चौतीस हजार फक्त) किंवा येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३११९ विषय क्रमांक - १५
दिनांक – ०५/०९/२०१८ विभाग – मध्यवर्ती भांडार
सूचक – मा.साधना मळेकर अनुमोदक – मा.सागर आंगोळकर
संदर्भ – मा.सहा.आयुक्त यांचे जावक क्र.मभां/५/कावि/५६९/२०१८ दि.३०/०८/२०१८

मा.सहा.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड मनपाचे प्रशासन विभागासाठी कॅनन या उत्पादीत कंपनीचे आवश्यक मल्टीफंक्शनल प्रिंटर मशीन (Multifunction Printer Machine) यंत्रणा खरेदी कामी केंद्र शासनाकडील Gem, government, e-market plus वर ऑनलाईन Bid व्दारे Bid Number-GEM/2018/B/43739 अन्वये दर मागविणेत आले होते. त्यानुसार तीन बिडरकडून ऑनलाईन दर प्राप्त झालेले आहेत. प्राप्त दरपत्रकामध्ये मे.ओम सिस्टीम,पुणे-१६ यांचे प्रिंटर (कॅनन मेक) बाब क्र.१ एकूण-०१ नग साहित्यासाठी र.रु.७,२५,०००/- लघुत्तम दर प्राप्त झाले आहेत. प्रस्तूतकामी केलेल्या संविदेची माहिती अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३१२० विषय क्रमांक - १६
दिनांक – ०५/०९/२०१८ विभाग–यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालय
सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.नम्रता लोंढे
संदर्भ – मा.सहा.आयुक्त (भांडार) यांचे जावक क्र.YCMH/भांडार/२/कावि/३६०/२०१८ दि.३१/०८/२०१८

मा.सहा.आयुक्त (भांडार) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

यशवंतराव चव्हाण स्मृती रुणालयाच्या रक्तपेढी विभागाने त्यांच्या विभागातील Terumo Penpol कंपनीच्या रक्तघटक संकलनासाठी आवश्यक असणा-या उपकरणाला त्याच कंपनीच्या १०० नग

SDP Bags with ACD Solution ची मागणी केलेली आहे. त्याकरिता उत्पादित कंपनीचे अधिकृत वितरक मे.श्री एंटरप्रायजेस, पुणे यांनी दर कमी करुन फेरसादर केलेला र.रु.८३००/- प्रती नग (सर्व करांसह) हा दर स्विकृत करण्यात आलेला आहे.त्यानुसार रक्तपेढी विभागासाठी आवश्यक SDP Bag with ACD Solution उत्पादित कंपनीचे अधिकृत वितरक मे.श्री एंटरप्रायजेस, पुणे यांचेकडून त्यांनी फेरसादर केलेला दर र.रु.८३००/- प्रती नगाप्रमाणे निविदा न मागवता महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाकडील शासन निर्णय क्र.भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/उद्योग-४, दि.०१/१२/२०१६ च्या परिच्छेद क्र.३.२.६ नुसार व मनपा अधिनियम अनुसुची ड प्रकरण ५(२)(२) नुसार थेट पध्दतीने खरेदी करण्यास व सदर खरेदीस होणारा खर्च र.रु.८,३०,०००/- (अक्षरी र.रु.आठ लाख तीस हजार फक्त) ला मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३१२१ विषय क्रमांक - १७

दिनांक – ०५/०९/२०१८ विभाग – उद्यान वृक्षसंवर्धन

सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.करूणा चिंचवडे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.उद्यान/४/कावि/४६७/२०१८ दि.२८/०८/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाचे उदयान विभागाकडील निविदा नोटीस क्र.१/२०१८-१९ वृक्षारोपणासाठी २ मीटर उंचीची रोपे पुरविणेबाबत मे.न्यू गार्डन गुरूज् फार्म अँन्ड नर्सरी यठेकेदाराची निविदा अंदाजपत्रकिय दरापेक्षा (-३.३० टक्के ने कमी) ही सर्वात कमी दराची निविदा स्विकृत करून कामाचा आदेश देऊन काम पुर्ण करणेत झाले असुन सन २०१८-१९ चे वृक्षारोपणाचे उद्दीष्ट पुर्ततेसाठी वाढीव ३००० रोपांची आवश्यकता असुन मे.न्यू गार्डन गुरूस फार्म अँन्ड नर्सरी यांना निविदा नोटीस क्र.१/२०१८-१९ मधील प्रति नग ६२८.५५ या दराने वाढीव २५०० मोठी २ मीटर उंचीची रोपे पुरविणेचे काम करणेस मान्यता मिळालेली असुन करारनामा करून काम करून घेणेस व कामी येणारे प्रत्यक्ष (र.रू.१५,७१,३७५/-) (अक्षरी र.रू.पंधरा लाख एक्काहत्तर हजार तीनशे पंच्याहत्तर फक्त) खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३१२२ विषय क्रमांक - १८

दिनांक – ०५/०९/२०१८ विभाग – ड क्षेत्रीय, विद्युत

सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.अर्चना बारणे

संदर्भ – मा.अति.आयुक्त (१) यांचे जावक क्र.डक्षे/वि/वाकड/२९३/२०१८ दि.३०/०८/२०१८

मा.अति.आयुक्त (१) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

औंध रावेत रस्त्यावरील साईचौक येथील पुलास बाधा करणारी अति उच्चदाब (132 KV) विजवाहिनी हलविणे व मनपामार्फत ग्रेड सेपरेटरचे काम तसेच पिंपरी चिंचवड नवनगर विकास

प्राधिकरण यांचेमार्फत उड्डाण पुलाचे बांधकाम चालु करण्यात आलेले आहे. सदर ठिकाणी साई चौकातील पुलाचे बांधकामातील अति उच्चदाब(132 KV) विजवाहिनी अडथळा करीत असल्याने सेंट्रल स्पॅनचे काम थांबलेले आहे व त्यामुळे साई चौकातील ग्रेड सेपरेटर चे कामही थांबलेले असल्याने, सदरची अतिउच्चदाब विज वाहिनी त्वरीत हलविणे अत्यावश्यक आहे. याकरीता उपरोक्त विषयांकित कामाचे आदेश एजन्सी मे. कोकण मेलॅबल इंडस्ट्रिज यांना निवीदा क्र.33/1-2017/18 नुसार, आदेश क्र. वि/मुका/5/कावि/301/18 दि.14/8/2018 अन्वये देण्यात आलेले आहेत. सदर कामाची मुदत दि.13/2/2019 पर्यंत आहे. महापारेषण कंपनीने उपरोक्त विषयांकित कामाचे अंदाजपत्रक SE/EHV/O&M/Circle /PN/2156 दि.16-8-2018 अन्वये मंजुर केलेले आहे. त्यानुसार सदर कामाचे सुपरव्हिजन चार्जेस र.रू.53,63,821/- (जीएसटी सह) महापारेषण कंपनी यांस अदा करणेकामी या विभागास कळविले आहे. सदरची रक्कम महापारेषण कंपनीला अदा करण्याकरीता मनपा नियमानुसार मा.स्थायी समिती सभेची मान्यता घेऊन अदा करावी लागणार आहे. त्याकामी कमीतकमी एक महिन्याचा कालावधी अपेक्षीत असल्याने तसेच सदरचे काम तातडीने पुर्ण करावयाचे असल्याने महापारेषण कंपनीला इकडील पत्र क्र.डक्षे/वि/वाकड/289/18 दि.27-8-2018 अन्वये मा. सह शहर अभियंता (वि/यां) यांचेमार्फत, मा.स्थायी समिती सभेची मान्यता घेऊनच सदर कामाचे सुपरव्हिजन चार्जेसची रक्कम मनपा मार्फत अदा करण्यात येईल याबाबतचे हमीपत्र देण्यात आलेले आहे. त्यानुसार सदरची रक्कम महापारेषण कंपनीस त्वरीत अदा करणे आवश्यक व क्रमप्राप्त आहे. सबब उपरोक्त विषयांकित कामाचे महापारेषण कंपनीने कळविलेनुसार सुपरव्हिजन चार्जेस र.रू.५३,६३,८२१/- (अक्षरी र.रू. त्रेपन्न लाख त्रेसष्ठ हजार आठशे एकवीस फक्त) (जीएसटी सह) महापारेषण कंपनी यांस अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३१२३ विषय क्रमांक - १९

दिनांक – ०५/०९/२०१८ विभाग – विद्युत मुख्यालय

सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे

संदर्भ – मा.अति.आयुक्त (१) यांचे जावक क्र.विमुका/५/कावि/३१२/२०१८ दि.३०/०८/२०१८

मा.अति.आयुक्त (१) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या विद्युत विभागाकडील नि.नो.क्र.20/3/2017-18 अन्वये अ प्रभाग कार्यक्षेत्रातील आवश्यक चौकामध्ये सार्वजनिक सुरक्षेच्या दृष्टीने सीसीटीव्ही यंत्रणा बसविणे व संबधित नियंत्रित पोलीस ठाण्याला जोडणेकामी मे.कॉमटेक टेलिसोलूशन्स प्रा. लि. नि.र.रू.67,47,447/- (अक्षरी र.रु.सदुसष्ठ लाख सत्तेचाळीस हजार चारशे सत्तेचाळीस फक्त) पेक्षा 3.2% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजूर दराने र.रू.65,31,529/- पर्यंत काम करून घेणेस या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक - ३१२४ विषय क्रमांक - २०
दिनांक – ०५/०९/२०१८ विभाग – स्थापत्य मुख्यालय
सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.सागर आंगोळकर
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/फ-मुख्य/३९३/२०१८ दि.३१/०८/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.10-1-2018-2019 अन्वये काळेवाडी फाटा ते देहु आळंदी पर्यंतच्या रस्त्यावरील बस थाब्यांची आवश्यकते नुसार सुधारणा विषयक कामे करणे. कामी मे.टेकसन बिल्डर्स नि.र.रू.3,27,11,955/- (अक्षरी र.रु.तीन कोटी सत्तावीस लाख अकरा हजार नऊशे पंचावन्न फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.3,26,47,969/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार विषयांकित काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.3,26,47,969/- पेक्षा 13.33% कमी म्हणजेच र.रु.2,82,95,995 /- + रॉयल्टी चार्जेस र.रु.48,386/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.15,600/- = एकुण र.रु.2,83,59,981 /- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३१२५ विषय क्रमांक - २१
दिनांक – ०५/०९/२०१८ विभाग – स्थापत्य मुख्यालय
सूचक – मा.साधना मळेकर अनुमोदक – मा.नम्रता लोंढे
संदर्भ – मा.कार्यकारी अभियंता यांचे जावक क्र.स्था/नि/फ-मुख्य/३९२/२०१८ दि.३०/०८/२०१८

मा.कार्यकारी अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील प्रस्तावा सोबतच्या प्रपत्र अ (१ ते १) मधील निविदा कामांचे अवलोकन होवुन नियमानुसार व निविदा अटीशर्ती प्रमाणे तसेच भागवाढ कलम लागू असल्यास, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/ वसुल करणे बंधनकारक राहिल या अटीस अधिन राहून संबंधित ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करुन कामाचे आदेश निर्गत केले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३१२६ विषय क्रमांक - २२
दिनांक – ०५/०९/२०१८ विभाग–यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालय
सूचक – मा.गावडे राजेंद्र अनुमोदक – मा.अर्चना बारणे
संदर्भ – मा.सहा.आयुक्त (भांडार) यांचे जावक क्र.YCMH/भांडार/२/कावि/३६५/२०१८ दि.०१/०९/२०१८

मा.सहा.आयुक्त (भांडार) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाच्या अतिदक्षता विभागातील कोव्हिडीयन कंपनीच्या (सध्या-मेडट्रॉनिक) ४ न्युपोर्ट व्हेंटिलेटर्सला कंपनी इंजिनियरच्या सर्व्हिस रिपोर्टनुसार ०४ नग O२ सेल तातडीची बाब म्हणून थेट पध्दतीने खरेदी करुन बदलण्यात आलेले असुन त्यानुसार संबंधित व्हेंटिलेटर्सचे अधिकृत AMC धारक मे.श्री कंन्स्ट्रक्शन, निगडी यांनी एकूण र.रु.९४,८७२/- (अक्षरी र.रु.चौ-यान्नव हजार आठशे बाहत्तर फक्त) चे बील कार्योत्तर अदायगीकामी सादर केलेले असुन सदर बील अदायगीस व होणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३१२७ विषय क्रमांक - २३
दिनांक – ०५/०९/२०१८ विभाग–यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालय
सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.सागर आंगोळकर
संदर्भ – मा.सहा.आयुक्त (भांडार) यांचे जावक क्र.YCMH/भांडार/२/कावि/३६६/२०१८ दि.०१/०९/२०१८

मा.सहा.आयुक्त (भांडार) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाच्या अतिदक्षता विभागातील कोव्हिडीयन कंपनीच्या (मेडट्रॉनिक) न्युपोर्ट व्हेंटिलेटर्सला कंपनी इंजिनियरच्या सर्व्हिस रिपोर्टनुसार O२ सेल व फ्लो सेंसर प्रत्येकी ०४ नग तातडीची बाब म्हणून बदलण्यात आलेले असुन त्यानुसार संबंधित व्हेंटिलेटर्सचे अधिकृत AMC धारक मे.श्री कंन्स्ट्रक्शन, निगडी यांनी एकूण र.रु.१,५७,१७६/- (अक्षरी र.रु.एक लाख सत्तावन्न हजार ऐकशे शहात्तर फक्त) चे बील कार्योत्तर अदायगीकामी सादर केलेले असुन सदर बील अदायगीस व होणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३१२८ विषय क्रमांक - २४
दिनांक – ०५/०९/२०१८ विभाग–यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालय
सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे
संदर्भ – मा.सहा.आयुक्त (भांडार) यांचे जावक क्र.YCMH/भांडार/२/कावि/३६७/२०१८ दि.०१/०९/२०१८

मा.सहा.आयुक्त (भांडार) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाच्या NICU विभागातील महिंद्रा & महिंद्रा कंपनीने भेट स्वरुपात दिलेल्या ८ नादुरुस्त सिरिंज पंम्पची तपासणी कंपनीच्या इंजिनियने केली असुन संबंधित

सिरिंज पंम्पच्या दुरुस्तीसाठी संबंधित उत्पादित कंपनी M/s.Skanray Technologies Pvt.Ltd., Mysore यांनी एकूण र.रु.७५,५२०/- चे दरपत्रक सादर केले असुन सदरचे दरपत्रक स्विकृत करण्यात आले असुन त्यानुसार NICU विभागातील ८ नादुरुस्त सिरिंज पंम्पच्या दुरुस्तीकामी आवश्यक पार्ट संबंधित उत्पादित कंपनी M/s.Skanray Technologies Pvt.Ltd., Mysore यांचेकडून निविदा न मागवता, करारनामा न करता, थेट पध्दतीने खरेदी करण्यास व सदर दुरुस्तीसाठी होणारा खर्च एकूण र.रु.७५,५२०/- (सर्व करांसहित) (अक्षरी र.रु.पंच्च्याहत्तर हजार पाचशे वीस फक्त) ला मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजात दाखल करून घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक - ३१२९ विषय क्रमांक - २५

दिनांक – ०५/०९/२०१८

सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.सागर आंगोळकर

संदर्भ – मा.विकास डोळस, मा.सागर आंगोळकर यांचा प्रस्ताव –

मुंबई पुणे रस्त्यावरील ग्रेड सेप्रेटेर रस्त्यावर असलेल्या खालील प्रमाणे अंडरपास आहेत.

| अ.क्र. | अंडरपासचे ठिकाण |
|---|---|
| १ | आंबेडकर पुतळा चौक के.एस.बी.कंपनी समोर पुणे फेसिंग |
| २ | आंबेडकर पुतळा चौक म.न.पा.समोर मुंबई फेसिंग |
| ३ | पुणे मुंबई रस्ता म.न.पा.फुटवे जवळ पुणे फेसिंग |
| ४ | पुणे मुंबई रस्ता म.न.पा.फुटवे जवळ मुंबई फेसिंग |
| ५ | अंडरपास आहिल्यादेवी होळकर चौक पुणे फेसिंग |
| ६ | अंडरपास आहिल्यादेवी होळकर चौक मुंबई फेसिंग |
| ७ | अंडरपास चिंचवड पेट्रोलपंप चौक पुणे फेसिंग |
| ८ | अंडरपास चिंचवड पेट्रोलपंप चौक मुंबई फेसिंग |
| ९ | अंडरपास चिंचवड स्टेशन पुणे फेसिंग |
| १० | अंडरपास चिंचवड स्टेशन मुंबई फेसिंग |
| ११ | अंडरपास खंडोबामाळ चौक पुणे फेसिंग |
| १२ | अंडरपास खंडोबामाळ चौक मुंबई फेसिंग |

वरील ठिकाणी जाहिरात प्रसिध्दीचे हक्क निविदेद्वारे देण्याचे नियोजित आहे. मात्र निविदा कार्यवाही पुर्ण होण्यामध्ये जो कालावधी लागणार आहे यामध्ये सुध्दा मनपाचे आर्थिक फायदे लक्षात

घेऊन मनपाच्या प्रचलित जागा भाडे दराच्या पेक्षा १० टक्के जास्त दराने आकारणी करुन सदर अंडरपासवर जाहिरात प्रसिध्दीसाठी मे.माई मेडिया हाउस एम.एच.१४ प्रा.लि.प्रधिकरण, निगडी या संस्थेस जाहिरात प्रसिध्द करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच मुंबई पुणे रस्त्यावरील भक्ती शक्ती चौक निगडी ते दापोडी दरम्यान सर्व्हिस रस्ता व ग्रेड सेपरेटरचा रस्ता यावर मनपाने बांधलेल्या सर्व कमानीवरील पुण्याकडे जाताना दिसणा-या बाजूस तसेच दापोडी ते निगडी भक्ती शक्ती चौक दरम्यान मुंबईकडे जाताना सर्विस रस्ता व ग्रेड सेप्रेटरचा रस्ता यावर मनपाने बांधलेल्या सर्व कमानीवरील मुंबईकडे जाताना दिसणा-या बाजुस निविदा मंजूरी कार्यवाही पुर्ण होईपर्यंतच्या कालावधीसाठी सर्व कमानींवर जाहिरात प्रसिध्दीसाठी मे.माई मेडियाहाऊस एम.एच.१४ प्रा.लि.प्राधिकरण, निगडी या संस्थेस मनपाच्या प्रचलित जागा भाडे दराच्या पेक्षा १० टक्के जास्त दराने आकारणी करुन जाहिरात प्रसिध्द करण्यास मान्यता देण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३१३० विषय क्रमांक - २६

दिनांक – ०५/०९/२०१८ विभाग – लेखा

सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.विकास डोळस

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.लेखा/०६/कावि/१०३१३/२०१८ दि.५/९/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवून –

सह शहर अभियंता, विद्युत विभाग यांनी दि.३१/०८/२०१८ चे प्रस्तावान्वये तरतूद वर्गीकरणाबाबत व कामांची वाढीव अंदाजपत्रकीय रक्कमांना प्रशासकीय मान्यता घेणेबाबत प्रस्ताव सादर केलेला आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकातील विद्युत मुख्य कार्यालयांतर्गत असलेल्या क्षेत्रिय कार्यालयांना कामांचे आवश्यकतेनुसार अंदाजपत्रकात करणेत आलेल्या तरतूदीपेक्षा वाढीव रकमांची आवश्यकता आहे. याकामी चालू कामांतील शिल्लक रकमा व आवश्यक नसलेल्या/ रद्द कामांवरील शिल्ल्क तरतूद रकमा इतर कामांवर वर्ग करता येईल.तसेच ज्या कामांना मुळ प्रशासकीय रक्कम कमी आहे,त्या कामांना सुधारित प्रशासकीय मान्यता घेणेची आवश्यकता आहे, याकामी भांडवली अ अंदाजपत्रक, प अंदाजपत्रक, महसुली अंदाजपत्रकातील तरतुदींमध्ये प्रस्तावात नमूद प्रमाणे वाढ व घट करता येईल. तसेच पर्यावरण अभियांत्रिकी विभागाकरीता आवश्यक असलेल्या कामाकरीता रक्कम ही प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे उपलब्ध करुन देता येईल.त्याकामी विभागाअंतर्गत र.रु.७,७८,८४,७९१/- वर्गीकरण करणेस व उपरोक्त कामांची वाढीव अंदाजपत्रकीय रक्कमांना प्रशासकीय मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे (वाढ/घट र.रू. ७,७८,८४,७९१/-) तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विद्युत मुख्य कार्यालयांतर्गत फ क्षेत्रिय कार्यालयाकडील प्रस्तावात नमूद केलेल्या कामांवर सन २०१८-२०१९ करिता

तरतूद कमी असल्याने या कामा करिता स्थापत्य मुख्य कार्यालयाने तरतूद उपलब्ध करून दिली आहे त्यानुसार अंदाजपत्रकातील तरतूदीमध्ये प्रस्तावात नमूद प्रमाणे वाढ/घट र.रू.२३,००,०००/- करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३१३१ विषय क्रमांक - २७

दिनांक – ०५/०९/२०१८ विभाग – फ क्षेत्रीय, स्थापत्य

सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.विकास डोळस

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.फक्षेका/स्था/कावि/४७७/२०१८ दि.३/९/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

फ क्षेत्रीय कार्यालय, स्थापत्य विभागात कार्यरत कार्यकारी अभियंता, यांनी त्यांच्या कार्यालयीन वापराकरीता असलेले फ क्षेत्रीय कार्यालय, स्थापत्य विभागाकडील वाहन क्र.MH14 M 0297 (AMBESSEDOR) वारंवार नादुरुस्त होत असलेने स्थापत्य विषयक प्रभाग/ मुख्यालय स्तरावरील कामांची पाहणी करणेकामी अडथळे निर्माण होत असल्याने नवीन वाहन खरेदी करुन मिळावे याकरीता दि.१८/०७/२०१८ रोजी अर्ज दिलेला आहे. सदर वाहन निर्लेखित करुन नवीन वाहन खरेदी करणेकामी मान्यता मिळणेकामी प्रस्ताव कार्यशाळा विभागाकडे पाठविण्यात आला होता. दि.०२/०८/२०१८ रोजीचे कार्यकारी अभियंता, कार्यशाळा यांचेकडील अभिप्रायानुसार वाहन क्र.MH14 P 4026 हे वाहन निर्लेखित करणेबाबतचा अभिप्राय प्राप्त झालेला आहे. शासन निर्णय वित्त विभाग क्र. विअप्र १०९१ प्र.क्र. विनियम, मुंबई ४०००३२ दि.१/१०/१९९१ अन्वये वेगवेगळी वाहने निरुपयोगी ठरविणे बाबत दिलेले निकष विचारात घेऊन नवीन वाहन खरेदी शासनाने ठरवुन दिलेल्या मर्यादित किमतीत खरेदी करणेबाबत कार्यवाही करणेबाबत कार्यशाळेने अभिप्राय दिलेला आहे. शासनाकडील निर्णयानुसार वाहन खरेदी किंमत रक्कम रु.६,००,०००/- च्या मर्यादेत करावी लागणार आहे. कार्यकारी अभियंता, स्थापत्य, फ क्षेत्रीय कार्यालय या विभागाकरीता TATA ZEST XT RT 90 PS BS IV PETROL, हे वाहन खरेदीकामी प्राप्त कोटेशननुसार एकुण किंमत निव्वळ रक्कम रु.५,५८,६४२/- (अक्षरी र.रु.पाच लाख अठावन्न हजार सहाशे बेचाळीस फक्त) किंवा वाहन डिलीव्हरी घेते वेळेस देय होणारी किंमत मे. TATA MOTORS लि. मुंबई यांना अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३१३२ विषय क्रमांक - २८
दिनांक – ०५/०९/२०१८ विभाग – वाहन दुरूस्ती कार्यशाळा
सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.विकास डोळस
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.काशा/३/कावि/६७७/२०१८ दि.४/९/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मा.सभापती शिक्षण समिती यांच्या वापरात असलेले वाहन हे हिंदुस्तान मोटर्स या उत्पादित कंपनीचे अम्बेसिडर या प्रकारचे वाहन आहे. सदरचे वाहन हे दि.२६/१२/२००३ रोजी खरेदी करण्यात आले असून त्याची खरेदी किंमत र.रु.४,००,०११/- एवढी आहे. सदर वाहनाचे दि.३१/८/२०१८ रोजी पर्यंत १४ वर्ष ८ महिने इतके आयुष्यमान झाले असून सदर वाहनाचे किलोमीटर २,४०,७१५ इतके झाले आहे. सदर वाहनांवर दुरुस्ती व देखभाल करिता दि.१६/८/२०१८ पर्यंत एकूण र.रु.९,१३,३७१/- इतका खर्च करण्यात आला आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील मोटार वाहने हि महाराष्ट्र शासनाकडील शासन निर्णय विअप्र-१०९१/प्र.क्र१२/ विनियम मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक – १/१०/१९९१ ला अधीन राहून निरुपयोगी ठरवून निर्लेखित केली जातात. सदरचे शासन निर्णयामध्ये मोटार वाहन व जीप इत्यादी वाहने २,४०,०००/- व १० वर्ष या पैकी जे नंतर पूर्ण होईल या अटींची पूर्तता करत असलेस वाहन निर्लेखित करता येईल अशी अट आहे. उपरोक्त वाहन हे शासन निर्णयातील अटींची पूर्तता करत असल्याने सदरचे वाहन निर्लेखित करून मा.सभापती शिक्षण समिती यांचे कार्यालयीन वापरा करिता M/S.TATA MOTORS या कंपनीचे TATA ZEST(PETROL) या प्रकाराचे नविन वाहन गव्हरमेंन्ट ई मार्केट दराने (GeM) निविदा न मागविता , करारनामा न करता थेट पद्धतीने खरेदी करणे कामी येणारे र.रू.५,५८,६४२/-(अक्षरी र.रू.पाच लाख अठ्ठावन्न हजार सहाशे बेचाळीस फक्त) चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३१३३ विषय क्रमांक - २९
दिनांक – ०५/०९/२०१८ विभाग – दूरसंचार
सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.सागर आंगोळकर
संदर्भ – मा.अति. आयुक्त (१) यांचे जावक क्र.दूरसंचार/२/कावि/८८/२०१८ दि.४/९/२०१८

मा. अति. आयुक्त (१) यांनी शिफारस केले प्रमाणे –

श्री.राहूल जाधव, मा.महापौर दि.७/०९/२०१८ ते ९/०९/२०१८ या कालावधीत येरेव्हान, आर्मेनिया येथे होणा-या महापौर परिषदेस उपस्थित राहणार असलेने त्यांचे कार्यालयीन वापरातील मोबाईल क्रमांक ९६६५४६३६३६ वर सदर कालावधीत इंटरनॅशनल रोमिंग व आय.एस.डी. सुविधा पूरविणेस व होणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३१३४ विषय क्रमांक - ३०

दिनांक – ०५/०९/२०१८ विभाग – वैद्यकिय मुख्य कार्यालय

सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.सागर आंगोळकर

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.वैद्य/१/कावि/९९७/२०१८ दि.१/९/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभागांतर्गत विविध दवाखाना/ रूग्णालयमध्ये प्रस्तावात नमूद प्रमाणे विविध अभिनामाची पदे एकत्रित मानधनावर हंगामी स्वरूपात ६ महिने कालावधीकरीता भरणेबाबत व जाहिरात प्रसिध्द करणेबाबत तसेच व भविष्यात वेळोवेळी रिक्त होणारी सर्व पदे दर सोमवारी Walk In Interview पध्दतीने मुलाखती आयोजित करुन भरणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३१३५ विषय क्रमांक - ३१

दिनांक – ०५/०९/२०१८ विभाग – लेखा

सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.अर्चना बारणे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.लेखा/३/कावि/२६२/२०१८ दि.३/९/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचार घेवून –

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या सन २०१८/१९ चे अंदाजपत्रकात पीएमपीएमएल निधी या लेखाशिर्षावर र.रु.१६४.५६/- कोटी (अक्षरी र.रु.एकशे चौसष्ट कोटी छपन्न लाख फक्त) तरतूद करणेत आली असून यामध्ये संचलनतूट ८१.५६/- कोटी विविधप्रकारचे पासेस र.रु.२३/- कोटी व बसेस खरेदी र.रु.६०/- कोटी असा अपक्षीत खर्च गृहीत धरण्यात आलेला आहे. सदर रकमेतून सप्टेंबर २०१८ ते फेब्रुवारी २०१९ अखेर दरमहा रक्कम रुपये ६ कोटी संचलनतूट व सवलतीचे पासेसपोटी र.रु.१.५० कोटी असे एकूण र.रु.७.५० कोटी (अक्षरी र.रु. सात कोटी पन्नास लाख) फक्त याप्रमाणे अग्रीम स्वरुपात अदा करावयाचे असल्याने व सदरची बाब आर्थिक स्वरुपाची असल्याने मान्यता देणेत येत आहे. तसेच प्रस्तुत विषयातील पीएमपीएमएल ला ३ महिन्याची संतलन तुट देणेत यावी तथापि पीएमपीएमएल च्या सर्व संबंधित अधिका-यांनी स्थायी समिती सभेस उपस्थित राहणे आवश्यक आहे. तसेच सर्व सदस्यांच्या पीएमपीएमएल बाबतच्या तक्रारींच्या समस्यांबाबत निरांकरण करणे आवश्यक आहे अन्यथा पीएमपीएमएल ची संचलन तुट यांबविण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३१३६ विषय क्रमांक - ३२
दिनांक – ०५/०९/२०१८ विभाग – मध्यवर्ती औषध भांडार
सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.नम्रता लोंढे
संदर्भ – मा.सहा.आयुक्त यांचे जावक क्र.मऔभां/१/कावि/१२८/२०१८ दि.४/९/२०१८

मा.सहा.आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीमध्ये स्वाईन फ्ल्यु आजारासाठी मनपा दवाखाने/रुग्णालयासाठी आवश्यक असणारी Cap Oseltamivir 75 mg खरेदी करणेकामी ई निविदा नोटीस क्र ६/२०१८-१९ प्रसिध्द करणेत आली होती. सदर निविदेस दोन वेळा मुदतवाढ देऊनही एकच निविदा प्राप्त झाली आहे. वातावरणातील बदलामुळे पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीत स्वाईन फ्ल्यु रुग्णांच्या संख्येत लक्षणीय वाढ होत असुन, रुग्णांकरिता आवश्यक औषधे तातडीने उपलब्ध होणेची मनपा दवाखाने/रुग्णालयाची मागणी असल्याने सदर आजारावरील Cap Oseltamivir 75 mg खरेदीकामी प्राप्त एकच लघुत्तम निविदाधारक मे.शशी एन्टरप्रायजेस यांचा प्राप्त लघुत्तम दर र रु ३७.९० प्रती गोळी असे एकुण ५०००० गोळया आवश्यकतेनुसार खरेदी करणेकामी र.रु.१८,९५,०००/- (अक्षरी र.रू. अठरा लाख पंच्यान्नव हजार फक्त) इतका खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३१३७ विषय क्रमांक - ३३
दिनांक – ०५/०९/२०१८ विभाग – मध्यवर्ती औषध भांडार
सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.नम्रता लोंढे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मभां/०४/कावि/५८२/२०१८ दि.५/९/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाचे गणवेश देय कर्मचा-यांना पावसाळी साधने रेनकोट/रेनसुट खरेदीकामी ई नि.सु.क्र.10/2018-19 अन्वये प्रसिध्द करुन ऑनलाईन निविदा दर मागविणेत आले होते. प्राप्त निविदेमधील मे सुपर प्लॅस्टीक कॉर्पोरेशन, मुंबई यांचे पावसाळी साधने रेनकोट/रेनसुट बाब क्र. 01 ते 07 साठी एकुण र.रु.45,83,867/- (अक्षरी र.रु.पंचेचाळीस लाख त्र्याऐंशी हजार आठशे सदुसष्ट फक्त) इतका खर्च येणार आहे. प्राप्त लघुत्तम दर हे मनपा अंदाजपत्रकीय दर एकुण र.रु.46,77,415/- पेक्षा 1.99 टक्केने कमी आहेत. सदरचे दर स्विकृत करणेस मान्यता दिलेली असुन त्यांचेबरोबर करारनामा करणेस व येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३१३८ विषय क्रमांक - ३४

दिनांक – ०५/०९/२०१८

सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.करूणा चिंचवडे

संदर्भ – मा.विकास डोळस, मा.करूणा चिंचवडे यांचा प्रस्ताव -

भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्या वाढदिवसाच्या निंमित्ताने अभियंता दिन दि.१५ सप्टेंबर रोजी साजरा करण्यात येतो. पिंपरी चिंचवड महानगरपालिका ज्युनियर इंजिनीयर असोसिएशन मार्फत या दिनानिमित्त अभियंता दिन दि.१५/९/२०१८ रोजी साजरा करण्याचे नियोजित आहे. त्याअनुषंगाने प्रशिक्षण व चर्चासत्र आयोजित करण्यात आलेले आहे. त्याकामी मा.प्रा.नितिन बानगुडे-पाटील मुख्य वक्ते यांना प्रशिक्षणाचे मानधन म्हणून र.रू.५१,०००/- इतके व सदर कार्यक्रमासाठी कै.अंकुशरांव लांडगे सभागृह, भोसरीसाठी र.रू.३४,८७०/- इतका तसेच सदर कार्यक्रमासाठी इतर अनुषंगिक खर्च र.रू.५०,०००/- या प्रमाणे एकूण खर्च र.रू.१,३५,८७०/- अपेक्षित आहे. तरी मान्यवरांचे मानधन व कै.अंकुशराव लांडगे सभागृह, भोसरी यां कामासाठी एकूण र.रू.१,३५.८७०/- इतक्या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३१३९ विषय क्रमांक - ३५

दिनांक – ०५/०९/२०१८ विभाग – बीआरटीएस

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.नम्रता लोंढे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/बीआरटीएस/६६८/२०१८ दि.३१/८/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

निगडी दापोडी हा १२.५० कि.मी. लांबीचा बीआरटीएस कॉरीडॉर आहे. सदर कॉरीडॉरवर BRTS बस सेवा चालु करणेबाबत मा.मुंबई उच्च न्यायालयात याचिका क्र.२६/२०१३ दाखल होती. सदर याचिकेच्या दि.०९/०८/२०१८ च्या अंतिम सुनावणीत मा.उच्च न्यायालयाने सद्यस्थितीत २ महिनेसाठी बस सेवा सुरु करणेस परवानगी दिलेली आहे. या काळातील मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाच्या दिनांकापासुन १ महिनेच्या बस संचलनाच्या कालवधीत आय.आय.टी. मुंबई यांचे मार्फत सेफ्टी ऑडीट करणेस व सदर सेफ्टी ऑडीटचा अहवाल २ महिन्यात मा. उच्च न्यायालयास सादर करणेस आदेशीत केलेले आहे. सदरच्या बस संचलनात आय.आय.टी मुंबई यांनी मनपाकडे सादर केलेल्या अहवालानुसार पहिल्या महिन्यात १ व त्यानंतर तीन वर्षाच्या कालावधीत प्रत्येकी ६ महिन्यातुन एकदा सेफ्टी ऑडीट करणेस सुचविलेले आहे. तथापि याबाबत महानगरपालिकेने आय.आय.टी. मुंबई या संस्थेकडे सदर रोड सेफ्टी ऑडीट करणे बाबत मनपा कडील पत्र क्र.Civil/BRTS/ 432/2018 दि.२५/०६/२०१८ च्या पत्रान्वये विचारणा करणेत आली. सदर पत्राच्या अनुषंगाने आय.आय.टी. मुंबईचे प्रा. पी वेदागिरी यांनी दि.०५/०७/२०१८ ई-मेल नुसार सेफ्टी ऑडीटचे अंदाजपत्रक पाठविले असुन प्रस्तावात नमूद

प्रमाणे रक्कम कळविलेली आहे. तरी सदरचे अंतिम प्रस्तावानुसार एकुण र.रु.२७,००,०००/- सेफ्टी ऑडीट फी आय.आय.टी. मुंबई या केंद्र शासनाचे अंगीकृत शासकीय संस्थेस अदा करावे लागणार आहे. सदरच्या रक्कमेचा पहिला हप्ता म्हणजेच र.रु.१३,५०,०००/- महानगरपालिकेचे सन २०१८-१९ चे अंदाजपत्रकातील पान क्र.५२२ अ.क्र.५(३)(iv) वरील तरतुदर.रु.२५,००,०००/- चे तरतूदी मधून देता येईल. दुसरा व तिसरा हप्ता मिळुन एकुण र.रु.१३,५०,०००/- अनुक्रमे ६ महिने व १० महिने कालावधी नतंर देणेत येईल. सबब, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे दि.०९/०८/२०१८ चे आदेशाच्या अनुषंगाने विषंयाकित कामांचे सेफ्टी ऑडीट (Safety Evaluations) आय.आय.टी. मुंबई यांचे कडून करुन घेणे व त्याकामी आय.आय.टी. मुंबई यांनी मागणी केलेप्रमाणे वरील प्रमाणे र.रु.२७,००,०००/- (अक्षरी र.रु. सत्तावीस लाख फक्त) वरील प्रमाणे ३ हप्त्यात देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३१४० विषय क्रमांक - ३६

दिनांक – ०५/०९/२०१८

सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे

संदर्भ – मा.विलास मडिगेरी, मा. राजेंद्र गावडे यांचा प्रस्ताव –

मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा यापुढे दर आठवड्याच्या मंगळवारी दु.२.०० वा आयोजित करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले

**(ममता विनायक गायकवाड)**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/३/कावि/१०६७/२०१८
दिनांक - ०५/०९/२०१८

**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

(क्र.फक्षेका/स्था/कावि/५५६/१८ दि.१३/८/२०१८ विषय क्र.१० चे लगत)

Pimpri Chinchwad Municipal Corporation, Pimpri , Pune – 18.

Name of Work -प्रभाग क्र.१ चिखली मधील उर्वरित रस्त्यांचे हॉटमिक्स पद्धतीने डांबरीकरण करणे व नव्याने ताब्यात आलेले रस्ते डांबरीकरण करणे.

REFERENCE :- QUOTATION NOTICE F Zone/civil/2/2018-19 DATE :-13/07/2018

**Comparative Statement.**

| SR.NO. | NAME OF CONSULTANT | UNIT | CATEGORY OF CONSULTANT (AS PER QUOTATION NOTICE ) | ITEM RATE ( % ) AGAINST COST OF WORK PUT TO TENDER | | | REMARKS |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | PRE-TENDER ACTIVITY | POST TENDER ACTIVITY | TOTAL | |
| 1 | C V KAND CONSULTANTS PVT.LIMITED | % PER WORK- | II | 0.74 | 1.00 | 1.74 | LOWEST OFFER |
| 2 | INFINITY CONSULTING ENGINEERS | % PER WORK- | II | - | - | 2.00 | |
| 4 | SWARAJ ENGINEERING CONSULTANCY | % PER WORK- | II | - | - | 2.00 | |
| 5 | SACHIN APATE & ASSOCIATES | % PER WORK- | II | - | - | 2.00 | |
| 6 | DESK CONSULTANTS | % PER WORK- | II | 1.00 | 0.90 | 1.90 | |

Executive Engineer (civil)
F Zone PCMC

(क्र.स्था/नि/फ-मुख्य/कावि/३९२/१८ दि.३०/८/२०१८ विषय क्र.२१ चे लगत)

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-१८ स्थापत्य मुख्यालय
क्र.स्था/नि/फ-मुख्य/३९२/२०१८
दि.३०/८/२०१८

प्रपत्र अ ( १ ते १ )

| अ. क्र. | ठेकेदाराचे नाव | निविदा क्रमांक | कामाचे नाव | करारनामा केलेली तारिख | कामाचा आदेश क्रमांक | कामाचा आदेशाची तारीख | निविदा रक्कम | स्विकृत दर | | निविदा खर्चाची मान्यतेची रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | | १० |
| १ | मोहनलाल मथराणी कन्स्ट्रक्शन प्रा.लि. | ७३/३७/२०१७-१८ | प्रभाग क्र. ३५ धावडेवस्ती येथील रस्त्यांची दुरुस्ती करणे. | ०१/०८/१८ | स्था/नि/फ-मुख्य/३६२/२०१८ | ०२/०८/१८ | १५,००,००० | १३.९९ | %कमी | १२९०१५० |
| | | | एकुण र.रु. | | | | १५,००,००० | | | १२,९०,१५० |

कार्यकारी अभियंता
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८